# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

**दिनांक १८.०९.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १७.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ११ केसेसमध्ये ११ ईसमावर कारवाई करून एकुण १,५८,५९०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये १० केसेसमध्ये १३ इसमांवर कारवाई करून एकुण २,४२,५९२/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १५६३ केसेस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये २७ केसेस, ओव्हरस्पिडींग बाबत कलम ११२/१८३ मोवाका अन्वये ४४ केसेस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये २४ केसेस,, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये १४५ केसेस, ऑन रोड पार्कीग कलम १२२/११७ मोवाका अन्वये १९७ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये १६ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४ए मोवाका अन्वये ४२ केसेस, ड्रायव्हींग विदाऊन युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ५७ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ४५ केसेस, बेदरकापणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०५ केसेस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये २४ केसेस, विटाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४बी(१) मोवाका अन्वये ०८ केसेस व इतर कलमांखालील गुन्हे असे एकुण २,३१५ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ०९,२४,२५०/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

**दिनांक १७.०९.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक १८.०९.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०२ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे**.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पथकाची कामगिरी :— अंमली पदार्थ डोडा पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १७.०९.२०२६ चे १६.४० वा. ते १९.०० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीत टेकानाका ते नारा रोडवरील सान्याल नगर, प्लॉट क्र. ०१, जयदीप मोबाईल शॉपसमोरील सार्वजनिक रोडवर एक ६० ते ६५ वर्षीय इसम आपले हातात पिवळया रंगाच्या प्लास्टीक बोरीमध्ये काहीतरी वस्तु घेऊन संशयीतरित्या जातांना दिसुन आला. त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरुन, त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव राजींदरसिंग प्रतापसिंग बाजवा वय ६४ वर्षे, रा. प्लॉट नं. ०१,

सान्यालनगर, कपीलनगर, नागपूर असे सांगीतले.एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन, त्याचे ताब्यातील बोरीची पाहणी केली असता, बोरीमध्ये अंमली पदार्थ डोडा पावडर मिळुन आली. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहिजे आरोपी रिंकल नावाचे इसमाकडून विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. आरोपीचे ताब्यातुन डोडा पावडर (प्लास्टीक बोरीसह) वजनी ९ किलो ६०४ ग्राम, ०१ मोबाईल फोल, इलेक्ट्रीक वनजकाटा व प्लास्टीक पन्नी बंडल असा एकुण १,५५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता डोडा पावडर विक्री करण्याकरीता बाळगताना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),१५(ब),२९ एन.डी.पी.एस. अॅक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे कपीलनगर येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव कपीलनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे, पोहवा. अनिस खान, राजेंद्र टाकळीकर, चंद्रशेखर गौतम, रुपेश नानवटकर, मुकेश राऊत, प्रमोद बावणे, चापोहवा. अमोल भक्ते, पोअं. दीपक बावणकर, लिलधर खिरटकर व मपोअं. कोमल सुर्यवंशी यांनी केली.




**<u>३) मानकापुर पथकाची कामगीरी :— प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हे दाखल.</u>**

दिनांक १६.०९.२०२६ चे २३.४५ ते १७.०९.२०२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, मानकापुर पोलीसांचे तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, मॅक्स हॉस्पीटल जवळील खान साहब मोहब्बती टि—स्टॉल ॲन्ड नाश्ता पॉईन्ट, मानकापूर चौक येथे दुकानमालक आपले दुकानात शासन प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थ विक्री करीत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, तेथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तिथे एक इसम हजर मिळून आल्याने, त्यास नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नांव शिवमकुमार शंकरलाल उमर, वय २६ वर्षे, रा. संजय राऊत यांचे घरी किरायाने, रानु शाळेजवळ, लुंबिनीनगर, मानकापुर, नागपूर असे सांगीतले. त्याचे दुकानाची पंचासमक्ष पाहणी केली असता, तेथे विमल, पानपराग प्रिमीयम पानमसाला पानबहार, पीके, रजनीगंधा, व्हीवन तंबाखु, बाबा सुगंधीत तंबाखु, रत्ना सुगंधीत तंबाखु, गोल्डन सफारी तंबाखु इत्यादी वेगवेगळ्या कंपनीचे शासन प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुजन्य पदार्थ मिळून

आले. आरोपीचे ताब्यातुन तंबाखुजन्य विक्रीचे रोख १,५००/—रू. व तंबाखुजन्य पदार्थ असा एकुण ९,५९०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता तंबाखुजन्य पदार्थ बेकायदेशीर विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीविरूध्द पोलीस ठाणे मानकापूर येथे कलम २२३,२७४,२७५ भान्यासं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उपायुक्त, परि.क्र. २, मा. श्री सत्यवीर बंडीवार, सपोआ, सदर विभाग, वपोनि. मानकापुर श्री. हरीश कळसेकर यांचे मार्गदर्शनाखाली, पोउपनि. नितीन वाघोडे, सुनिल डगवाल व त्यांचे पथकातील अंमलदार यांनी केली.

**<u>४) एस्कॉर्ट पथकाची कामगीरी :— अवैध दारुविक्री करणाऱ्या हद्दपार आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १७.०९.२०२६ चे ०१.०५ वा. ते ०१.४० वा. चे सुमारास, एस्कॉर्ट पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतील यशोधरानगर चौक, लाल झेंडा चौकजवळ राहणारा इसम नामे बाबुलाल गोविंदलाल घुमे, वय ६५ वर्ष याचे राहते घरी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, त्याचे राहते घरात देशी दारु संत्रा नं. १ च्या ९० मिलीच्या ५४ नग बॉटल, ६० लीटर हातभट्टीची व मोहफुलाची गावठी दारु चा साठा मिळन आला. आरोपीला मुद्येमालाबाबत विचारणा केली असता, त्याने तो विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. आरोपींचे ताब्यातुन दारुसाठा व दारुविक्रीचे रोख असा एकुण १८,३७०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीस ताब्यात घेवुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, तो सराईत दारुविक्री करणारा असल्याने, मा. पोलीस उपआयुक्त, परि. क्र. ५ यांनी गणेशोत्सव व नवरात्र काळापुरते तात्पुरते दिनांक १३.०९.२०२६ ते २६.०९.२०२६ या कालावधीकरीता तात्पुरते हद्दपार केल्याचे दिसुन आले.

आरोपी याने मा. पोलीस उपआयुक्त, परि.क्र. ५ यांचे मनाई आदेशाचे उल्लघन केल्याने व अवैधरित्या दारुविक्री करण्यासाठी दारूसाठा बाळगतांना समक्ष मिळून आल्याने, त्याचेविरुध्द पोलीस ठाणे यशोधरानगर येथे कलम २२३ भान्यासं. सहकलम ६५(ई) म.दा.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीस मुद्येमालासह यशोधरानगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे मार्गदर्शनात, सपोनि. भगवान कोळी, मपोउपनि. स्वाती देशमुख, पोहवा. विजय गिरी, पोअं. आशिष गायधने, अर्शद शेख, मनोज निमकर, दिनेश क्षीरसागर, रवि असहिरे व चापोअं. चंद्रकांत यांनी केली.



**५) पोलीस उपायुक्त, परि.क्र. ६ विशेष पथक व खापरखेडा पोलीसांची संयुक्त कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १७.०९.२०२६ चे १७.४० वा. ते २१.०० वा. चे दरम्यान, पोलीस उपायुक्त, परि.क्र. ६ विशेष पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत, चनकापुर सिल्लेवाडा वस्ती रोडवरील गणेश मंदीरसमोरील स्ट्रीट लाईटचे उजेडाखाली एका काळ्या रंगाचे होंडा ॲक्टिवा वाहनासह शैलेष नावाचा इसम गांजा विक्रीकरीता उभा आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, नमुद ठिकाणी जावुन पाहणी केली असता, तेथे एक काळया रंगाची होंडा ॲक्टिवा मोपेड क्र. एमएच ४९ सीई ५७०५ वर मिळालेल्या वर्णनाचा इसम संशयीतरित्या बसलेला दिसून आल्याने, त्यास पंचासमक्ष ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव शैलेष रामलाल सुर्यवंशी, वय ४४ वर्ष, रा. वार्ड क्र. २, ओमनगर, चनकापुर, खापरखेडा असे सांगितले. त्याची व वाहनाची झडती घेतली असता, त्याचे ताब्यातील वाहनाचे डिक्कीमध्ये एका प्लास्टीक पन्नीमध्ये अंमली पदार्थ हिरव्या रंगाचा गांजा एकुण वजनी ४६४ ग्राम ८५० मिलीग्राम मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन गांजा, ०१ मोबाईल व होंडा ॲक्टिवा मोपेड असा एकुण ७५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीची सखोल विचारपूस केली असता, त्याने त्याचा साथिदार पाहिजे आरोपी नामे अयुब छुट्टन सिद्यीकी, वय ४७ वर्ष, रा. हनुमान मंदीरजवळ, चनकापुर, खापरखेडा याचेकडून विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. आरोपी हा स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता गांजाची विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब)(ii)(क),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे खापरखेडा येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस ठाणे खापरखेडा पोलीसांसह पोउपनि. अजिंक्य कदम, पोहवा. मुकेश महालगावे, अरुण चांदणे, मंगेश लांजेवार, पोअं. हेमचंद निल गंगावणे व चापोअं. शुभम ठाकुर यांनी संयुक्तिकरित्या केली.



**६) एमआयडीसी पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक १८.०९.२०२६ चे ०१.०० वा. चे सुमारास, एमआयडीसी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना भिमनगर पाण्याचे टाकीजवळ एक इसम हातात पाईप घेऊन येणारे—जाणारे लोकांना शिवीगाळी करुन, धुमाकुळ घालतांना दिसुन आला. त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले व त्याचे हातातील पाईप काढून घेऊन, जप्त करण्यात आला. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव विकास उर्फ विक्की मोहन रहांगडाले, वय ३७ वर्षे, रा. भिमनगर, वार्ड क्र. ३, शिवमंदीर जवळ, एमआयडीसी, नागपूर असे सांगीतले. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता,

त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०७/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले.

आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने हातात पाईप घेऊन धुमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द कलम १४२,१३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी, पोलीस उपायुक्त, परि.क्र. २, मा. श्री. यशवंत नलावडे, सपोआ, एमआयडीसी विभाग, वपोनि. श्री. गोकुल महाजन यांचे मार्गदर्शनाखाली, पोहवा विजय, राजेश पोअं. सचिन सोनवाने व मनोज यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे भांडेवाडी :– जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक १७.०९.२०२६ चे २०.४५ ते २१.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी हे त्यांचे काका नामे उदय सुर्यवंशी, वय ४९ वर्ष यांना भेटण्यासाठी पोलीस ठाणे भांडेवाडी हद्यीत प्रजापतीनगर मेट्रो स्टेशनजवळील वाय. व्ही.पाटील देशी दारु भट्टीसमोर, सोनबानगर, भांडेवाडी येथे गेले असता, त्याठिकाणी आरोपी १) कुणाल कुकडे वय २१ वर्ष २) रुद्र उर्फ माचो बेंद्रे वय २० वर्ष, दोन्ही रा. प्रजापती नगर, नागपूर हे दोघेही दारुचे नशेत रस्त्यावरील कोणालाही शिवीगाळ करीत होते. त्यामुळे बबलु बंगाली पांडे, वय ४५ वर्ष, रा. प्रजापती नगर, मेट्रो स्टेशनजवळ, नागपूर यांनी आरोपींना शिवीगाळ का करता म्हणून हटकले असता, आरोपींनी बबलु पांडे यास शिवीगाळी करून जिवे ठार मारण्याचे उद्येशाने त्यांचे पोटावर चाकु मारुन गंभीर जखमी केले. फिर्यादी हे बबलु पांडे यांना वाचविण्याकरीता गेले असता, त्यांचे उजवे हाताचे पंजाला मार लागुन ते किरकोळ जखमी झाले. लोकांनी गंभीर जखमी बबलु पांडे यांना उपचाराकरीता भवानी हॉस्पिटल पारडी येथे दाखल केले आहे. उपचार सुरु आहे.

याप्रकरणी फिर्यादी नामे विमलकुमार सिध्दु प्रसाद, वय ३१ वर्ष, रा. प्लॉट क्र. १६३९/८१, श्यामराव गजभिये यांचे घरी किरायाने, भांडेवाडी रेल्वे स्टेशन रोड, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे भांडेवाडी येथे मसपोनि. समु चौधरी ८७६६५९०५९२ यांनी आरोपींविरूध्द कलम १०९(१), २९६, ३५२, ११८(१), ३(५) भा.न्या.सं. सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल केला व तात्काळ दखल घेऊन, आरोपी क्र. १) कुणाल सुखदेव कुकडे, वय २१ वर्ष, रा. गली क्र. २, प्रजापती नगर, सिदधार्थ रंगारीचे घरी किरायाने, भांडेवाडी, नागपूर २) रुद्र उर्फ माचो श्रीराम बेंद्रे, वय २० वर्ष, रा. प्रजापती नगर झोपडपट्टी, बुध्द विहारमागे, भांडेवाडी, नागपूर यांना अटक केली आहे. पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे अंबाझरी :–शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १७.०९.२०२६ चे २३.१० ते २३.५० वा. चे दरम्यान, अंबाझरी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, तेलंगखेडी गार्डनचे आमरोडवर एक इसम संशयीतरित्या दिसुन आला. त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्याचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अंकुश उर्फ मिठ्ठु अरुण मरसकोल्हे, वय २६ वर्षे, रा. राजीवनगर खदान, शिवमंदीर जवळ, पांढराबोडी, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात पॅन्टचे आत कंबरेत लपविलेली एक जुनी लोखंडी छोटी तलवार कि. ५००/–रू. .ची मिळून आल्याने जप्त करण्यात आली.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने जुनी लोखंडी छोटी तलवार बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोअं. मनिष रामटेके यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे अंबाझरी येथे पोउपनि. आदम शेख यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**